Acharya Javdekar College of Education Esta 1956 Gargoti Kolhapur

**Dr. Ravasaheb Kerappa Shelake**
Associate Professor
Acharya Jawadekar College of Education, Gargoti
Mob-8275459230
E mail ID-drrrkshelake@gmail.com

## Published Papers List 2019-2020

I) Published Papers in Refereed Journals as notified by the UGC

| Sr. No | Title with Page Nos. | Journal | ISSN ISBN No. | Impact Factor If any | Whether principal author/ corresponding author / Guide |
|---|---|---|---|---|---|
| 1 | शासनाकडून प्राथमिक स्तरावरील शिक्षणासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा शिक्षकांच्या कामगिरीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास<br>Page No. 90 to 92 | Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)<br>UGC Approved Journal No 48178, 48818 | ISSN–2278-5655 | EduIndex Impact Factor 5.18 | Principal |
| 2 | उच्च शिक्षणातील ई गव्हर्नन्स<br>Page No. 189 to 192<br>22 February 2019 | Aayushi International Interdisciplinary Research Journal Special Issue 50 | ISSN-2349-638X | 5.707 | Principal |
| 3 | बी.एड. प्रशिक्षणार्थीमधील शिक्षक समायोजनाचा शोधिकेद्वारे अभ्यास पृष्ठ क्रमांक १ ते ८ | Review of Research | ISSN-2249-894X | 5.7631 | Principal |
| 4 | मुलांकडून मोबाईलचा होत असलेल्या जास्त वापर एक अभ्यास<br>Page No. 505 to 508 | Navjyot International Interdisciplinary research journal Humanities Social Sciences languages commerce and Management Publication Kolhapur Special Issue September, 2019 | ISSN 2277-8063 | | IInd Co -Author |

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | भौगोलिक माहिती प्रणालीचे वाढते महत्त्व<br>Page No.468 to 472 | Navjyot International Interdisciplinary research journal Humanities Social Sciences languages commerce and Management Publication Kolhapur Special Issue September, 2019 | ISSN 2277-8063 | | IInd<br>Co -Author |

**II) Subject Books, published by National level publishers, with ISBN/ISSN number or State / Central Govt. Publications as approved by the University and posted on its website. The List will be intimated to UGC.**

| Sr. No. | Title with page nos. | Type of Book & Authorship | Publisher & ISSN/ ISBN No. | Whether Peer reviewed | No. of co-authors | Whether principal author /corresponding author /Guide |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | इतिहास इयत्ता ११ वी | महाराष्ट्र राज्य **HSC** पाठ्यपुस्तक | -- | -- | 27 | **BOS Working Committee member** |

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

AARHAT PUBLICATION & AARHAT JOURNAL'S
108, Gokuldham Park, Dr. Ambedkar Chowk, Near T.V. Tower, Badlapur (E)-421503.
**Email ID:** aarhatpublication@gmail.com • **Phone:** 9822307164
**Website:** www.aarhat.com

**Conference Book** **ISSN No-2278-5655**

NAAC Re- accredited with Grade B

Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

**Tel No.** 0231-2535043 www.smtckop.com **Email:** princ.smtbedko-mhgov.in

Conference Book ISSN No-2278-5655

NAAC Re- accredited with Grade B

Government of Maharashtra

# Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)- 416001

One Day Interdisciplinary International Conference

On

# SKILL DEVELOPMENT IN HIGHER EDUCATION



2nd February, 2019

**Tel No.** 0231-2535043 www.smtckop.com **Email:** princ.smtbedko-mhgov.in

*One Day Interdisciplinary International Conference*
*On*
***Skill Development in Higher Education***

**Book No : 1**

**First Edition**: 2nd February, 2019

**Organized by:**
**Shree Maharani Tarabai Government College of Education, Kolhapur, (Maharashtra)-**

**Published by**: Aarhat Publication & Aarhat Journal's
**Mobile N**o: 9822307164/8355852142

## Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)

*SJIF Impact Factor 6.236*

*Peer Reviewed Refereed Journal*

*ISSN 2278-5655,*

Volume–VIII, Special Issue–II

**EDITORS:**

**Disclaimer**:

The views expressed herein are those of the authors. The editors, publishers and printers do not guarantee the correctness of facts, and do not accept any liability with respect to the matter published in the book. However editors and publishers can be informed about any error or omission for the sake of improvement. All rights reserved.
All views expressed in the journal are those of the individual contributors. **Any issues with reference to the research paper, the individual author/s are responsible.** The editor and Publisher are not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.
No part of the publication be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means electronic, mechanical, photocopying, recording and or otherwise without the prior written permission of the publisher and authors.

# INDEX


| Sr. No. | Title Name | Name of the Perticipiate | Page No |
|---|---|---|---|
| 1 | Classroom Management Skills For Changing Role Of Teacher. | Dr.Deshpande Rajashri U. & Smt. Shweta Patil | 1 |
| 2 | Skill Development in 21st Century | Prof. A. M. Gurav | 3 |
| 3 | Development and Assessment of Teaching Skills in Teacher Trainees: What NCTE Suggests | Ganesh Chandra Naik | 11 |
| 4 | Effect Of Constructivist Approach On The Achievement In Mathematics | Dr. Jyoti S.Pattanshetti | 14 |
| 5 | Skills Required for Teacher Educators to foster Scientific Concepts among Science Learners | Shweta P. Patil Dr. Rajashree U. Deshpande | 18 |
| 6 | Enhancing The Student-Teachers Skills Of The Instructional System Designing | Dr. (Ms.) Rupali Uttam Sankpal | 21 |
| 7 | Research Skills: Decisive Skills for 21st Century Learning | Dr. Krishna B. Patil | 25 |
| 8 | Soft Skills For Teachers -A Step Towards Professional Growth | Prof. Mahadev A. Pawar Ms.DivyanjaliKumar Mane | 30 |
| 9 | भावनिक व्यवस्थापनासाठी विवेकनिष्ठ विचार कौशल्ये | महेश वि. चव्हाण डॉ. कृष्णा भा. पाटील | 34 |
|  | Role of ICT for Soft Skill Development | Mrs.Smitadevi Mole | 40 |
| 10 | बी.एड अभ्यासक्रमांतर्गत समाविष्ट व्यवसायिक क्षमता विकसनातून विकसित होणार्या कौशल्यांचा अभ्यास | डॉ.विद्युतलता पांढरे व प्रा.सविता दुधभाते | 48 |
| 11 | Skill Development In Higher Agriculture Education Through Exprimental Learning Programme | Dr.D.D.Patange ,O.D.Rajmane ,M.M.Yadav & D.K.Kamble | 51 |
| 12 | २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्य व त्याची गरज | विशाल शेटे | 52 |
| 13 | २१ व्या शतकातील गणित शिक्षकाची कौशल्य | डॉ.सत्वशीला खामकर | 56 |
| 14 | उच्च माध्यमिक स्तरावरील दहा जीवन कौशल्यांचा अभ्यास | प्रा.तात्यासाहेब काटकर | 61 |
| 15 | ग्रामिण भारतातातील उच्च शिक्षण व कौशल्य वाचन | डॉ,दत्ता कुंचेलवाद | 64 |
| 16 | बी.एड प्रशिक्षणार्थीसाठी पूरक कौशल्य विकसन कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेच्या अभ्यास | डॉ.डीसले महादेव | 67 |
| 17 | Providing Three layer Security Through Pictographic Password to Protect Sensative Data form Intruders | K.G.Kharade ,V.S.Khumbhar & S.K.Kharade | 71 |

| | | | |
|---|---|---|---|
| 18 | पदवी व पदवीत्तर स्तरावर कादंबरी अध्यापनाचे स्वरूप व कौशल्य | डॉ.अशोक केंद्रे | 75 |
| 19 | भारतीय स्त्री शिक्षणातील बदलते प्रवाह | डॉ.जी.एन.पांचाळ व डॉ.एन.जी.सूर्यवंशी | 77 |
| 20 | द्विवार्षिक बी.एड कालावधीतील छात्राध्यापाकांच्या स्वकौशल्य संपादनाचा अभ्यास | डॉ.प्रतिभा देसाई | 82 |
| 21 | मराठी भाषिक कौशल्ये आणि व्यवसायाच्या संधी | डॉ.मोरे अर्चना | 87 |
| 22 | शासनाकडून प्राथमिक स्तरावरील शिक्षणासबंधी घेतलेल्या निर्णयांचा शिक्षकांच्या कामगिरीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास | डॉ.रावसाहेब शेळके | 90 |
| 23 | कौशल्याधारित शिक्षणाचे महत्व | डॉ.नदाफ एस.आय व डॉ.पांढरे वासंती | 93 |
| 24 | एकवीसाव्या शतकातील माहिती तंत्रज्ञान कोशल्याचे विकसन - एक अभ्यास | डॉ.प्रीती पाटील | 95 |
| 25 | कर्णबधीर विध्यार्थ्याच्या उच्च शिक्षणातील कौशल्य विकासामधील आव्हाने व संधी | स्वाती सदकाळे | 99 |
| 26 | Transformation Of Society Through Social Media | Dr.Madhuri Isave | 100 |
| 27 | Higher Education Of Skill Development In Urban And Rural Region | Dr. Bhaskar A. Mundewadi | 103 |
| 28 | प्रताप तत्वज्ञान केंद्राच्या तात्वीक विचारांचा अभ्यास | डॉ.नितीनकुमार दादासाहेब माळी प्रा.नरेश पितांबर सावंत | 107 |
| 29 | Role of ICT and Constructivist Design for Teaching Skill Development | Dr. Kisan Jijaba Shinde | 110 |
| 30 | Innovative Practices To Enhance Teacher Education | Dr.Suryawanshi S.K | 114 |
| 31 | Role of Skill Development in Higher Education for Promoting Employment and Employability in Emerging Global Economy | Prof. Rohini G. Deshpande | 119 |
| 32 | To study the mistakes of 6th Std. Students to construct the sentences and solutions | Patil Prajkta Jagannath | 125 |
| 33 | शिक्षणशास्त्र महाविदयालयातील व्यावसायिक क्षमतांमध्ये वाढ या विषयाअतंर्गत स्व – आकलन संबंधी कौशल्यांच्या विकाससाठी दिलेल्या उपक्रमांच्या परिणामांचा अभ्यास | प्रा. डॉ. सौ. उर्मिला राजेश पाटील | 130 |
| 34 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या मराठी आशय ज्ञानासाठी ऑनलाईन मूल्यमापन कार्यक्रम विकसित करणे | डॉ. केशव रामभाऊ मोरे | 135 |

# शासनाकडून प्राथमिक स्तरावरील शिक्षणासंबंधी घेतलेल्या निर्णयांचा शिक्षकांच्या कामगिरीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास

**प्रा. डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके,**
सहाय्यक प्राध्यापक,
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी ता. भुदरगड जि.कोल्हापूर

**सारांश (Abstract)**

कोणत्याही शिक्षण व्यवस्थेची उद्दिष्टे ही त्या - त्या देशाची शासन यंत्रणा ठरवत असते. ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तके इत्यादीमधून ती मुलांपर्यंत पोहचवली जातात. कोणत्याही राजकीय पक्षाचे सरकार आले तरी ते आपल्या पक्षाची विचासरणी , मूल्ये इत्यादी अप्रत्यक्षरित्या शिक्षण व्यवस्थेमध्ये समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतात याबाबतीत कोणतेही सरकार तटस्थ राहू शकत नाही सर्वच निर्णय चुकीचे असतात असेही नाही मात्र त्या निर्णयांची अंमलबजावणी ज्या श्रृंखलेखमधून होत असते त्यातील सर्वात शेवटचा घटक शिक्षक यांच्यावरची ही जबाबदारी फार महत्त्वाची आहे. विशेषता महाराष्ट्रातील प्राथमिक स्तरावर कार्य करणा-या जिल्हा परिषदेच्या शाळेत कार्यरत शिक्षकांच्या कामगिरीवर शासनाकडून घेतलेल्या जाणा-या विविध निर्णयांचा काय परिणाम होतो आहे ? त्यासंबंधी त्याची काय मते आहेत? कार्यरत प्राथमिक शिक्षकांना कोणते शालाबाह्य कामे करावी लागतात? त्या संबंधी त्यांची काय मते आहेत? इत्यादी प्रश्नांसंबंधी इत्यादी प्रश्नांच्या अनुषगाने प्रस्तुत संशोधनवर पेपरमध्ये अभ्यास करण्यात आला आहे.

**कळीचे शब्द (Key Words)-**

शासन निर्णय, प्राथमिक शिक्षण आणि शिक्षक, शिक्षकांची कामगिरी इत्यादी

**प्रस्तावना-**

एन.सी.टी.ई. रेग्युलेशन २०१४ नुसार बी.एड. एक वर्षीय अभ्यासक्रम २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून संपूर्ण देशात दोन वर्षांचा झाला आहे सदर अभ्यासक्रमामध्ये समाज़ाभिमुख प्रकल्प हे १०० गुणांचे प्रात्यक्षिक दिले आहे. सदर प्रात्यक्षिकांचा मुख्य उद्देश बी.एड. प्रशिक्षणार्थीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करणे, समाजाच्या सामाजिक व वैयक्तिक समस्या समजण्यास मदत करणे, समाजाच्या विविध समस्यांवर उपाययोजनांबाबत विचार करण्याची वृत्ती निर्माण करणे इत्यादी आहे. प्रस्तुत संशोधकाने बी.एड. प्रशिक्षणार्थीना **'शिक्षक समुदायाच्या'** कामगिरीवर शासनाकडून घेतलेल्या निर्णयाच्या अभ्यास करण्याची संधी दिली. त्यानुसार प्राप्त माहितीच्या आधारे काही निरीक्षणे व निष्कर्ष नोंदविले आहेत.

**संशोधनाची गरज व महत्त्व -**

शासन स्तरावरुन सातत्याने जे निर्णय घेतले जातात त्यासंबंधी शिक्षक समुदायाची काय मते असतात त्या शासन निर्णयामुळे शैक्षणिक गुणवत्तेवर काय परिणाम होतात शासन निर्णयांचा शिक्षक मानसिकतेवर काय परिणाम होतो म्हणजेच कार्यरत शिक्षकांना काय समस्या आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे व महत्त्वाचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) प्राथमिक शिक्षकांच्या सद्यस्थितील समस्या समजून घेणे.
२) प्राथमिक शिक्षकांच्या दैनंदिन कामाचे स्वरुप समजून घेणे.
३) प्राथमिक शिक्षणप्रणातील प्रश्नाचे आकलन करुन घेणे.

**संशोधन पद्धती**

प्रसुत संशोधनात वर्तमान स्थितीतील प्राथमिक शिक्षणाशी व शिक्षकांशी संबंधीत सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने सर्वेक्षण संशोधन पद्दधतीमधील विद्यालय सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा अवलंब करणेत आला आहे.

**संशोधन न्यादर्शन**

प्रस्तुत संशोधनासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळामध्ये कार्यरत ५० शिक्षकांची (महिला व पुरुष) म्हणून निवड केली आहे.

**संशोधन साधन**

प्रस्तुत संशोधनामध्ये सामग्री संकलनासाठी संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्र -**

प्रस्तुत संशोधनात प्राप्त सामग्रीच्या विश्लेषणसाठी शेकडेवाडी बरोबर वर्णनात्मक विश्लेषणचा उपयोग केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

१) प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष प्राथमिक शाळेतील शिक्षकांना लागू पडतात.

२) प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा व शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

**संशोधनाची कार्यवाही -**

प्रस्तुत संशोधक आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी येथे गेल्या १२ वर्षापासून सहाय्यक प्राध्यापक या पदावर कार्यरत आहे. बी.एड. व्दितीय वर्षांच्या चौथ्या सत्रात समाजाभिमूख प्रकल्प हे प्रात्यक्षिक कार्य आहे. त्या अंतर्गत प्राथमिक शिक्षकांच्या समस्या जाणून घेणेसाठी प्रश्नावली विकसित करुन घेण्यात आली त्यानंतर सर्व प्रश्नावली एकत्रित करुन त्याचे विश्लेषण केले आहे.

**निष्कर्ष**

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१) प्राथमिक शिक्षकांच्या सद्यस्थितील समस्या समजून घेणे.

२) प्राथमिक शिक्षकांच्या दैनंदिन कामाचे स्वरुप समजून घेणे.

३) प्राथमिक शिक्षणप्रणातील प्रश्नाचे आकलन करुन घेणे.

**निष्कर्ष**

१) प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकांपैकी सर्वाधिक ५४.२८% इतके शिक्षक हे बी.ए. व एम.ए. बी.एड. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेले आहेत. तर ४२.८५ % इतक्या शिक्षकांकडे नेमणूकीच्यावेळी असणारी डी.एड. ही शैक्षणिक अर्हता आहे. केवळ २.८५% इतक्या शिक्षकांनी एम.एड. ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेली आहे.

२) प्राथमिक शाळेत कार्यरत शिक्षकांच्या निवास स्थानापासून शाळेचे अंतर ० ते५ किमी दरम्यान असणा-या शिक्षकांचे प्रमाण ५४.२८% इतके आहे तर ६ कि.मी ते १० किमी अंतरापर्यंत शाळा असणा-या शिक्षकांचे प्रमाण ३७.१४% इतके आहे.

३) शासन स्तरावरावरील समित्यामध्ये काम करणा-या शिक्षकांचे प्रमाण अत्यल्प असून त्यांचे शेकडा प्रमाण २.५ इतके आहे.

४) प्राथमिक शाळेतील अध्यापन अनुभव ११ वर्षापेक्षा जास्त असणा-या शिक्षकांचे प्रमाण सर्वाधिक असून त्यांचे शेकडा प्रमाण ५७.५४ इतके आहे.

५) नेमणुकीच्यावेळी शासनाचे जे धोरण होते ते दैनंदिन शैक्षणिक कामकाजावर सकारात्मक परिणाम करणारे होते असे मत नोंदविणारे शिक्षक सर्वाधिक असून त्यांचे प्रमाण ५७.१४ टक्के इतके आहे.

६) आजच्या शासन निर्णय व धोरणांचा शैक्षणिक कामकाजावर विपरित परिणाम होत आहे असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते ६६.१७ % इतके आहे. काही प्रमाणात परिणाम होत आहे असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण अल्प असून ते ११. ८७ टक्के इतके आहे.

७) प्राथमिक शिक्षकांची ३ पेक्षा जास्त वेळा बदली झालेल्या शिक्षकांचे प्रमाण अधिक असून त्याचे प्रमाण ३९.३९ % इतके आहे.

८) प्राथमिक शिक्षकांना शासनाने वेळोवेळी सांगितलेली माहिती ऑनलाईन स्वरुपात भरावी लागते ही बाब शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम करणारी आहे असे मत व्यक्त करणा-या शिक्षकांचे प्रमाण जास्त असून ते ३५.२९% इतके आहे.

९) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे (RTE) या धोरणाचा शैक्षणिक गुणवत्तेवर सकारात्मक परिणाम होत आहे असे मत नोंदवणा-या शिक्षकांचे प्रमाण ३२.३५% इतके आहे.

१०) शिक्षकाच्या बदलीचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो असे म्हणणा-या शिक्षकांचे प्रमाण अत्यअल्प असून त्याचे प्रमाण १७.४२% इतके आहे.

११) ३७.४३% शिक्षकांना निवडणुक आयोगाची कामे अशैक्षणिक आहेत असे वाटते. मात्र सर्वात कमी १६.६६% शिक्षकांना पोषण आहाराचे काम हे अशैक्षणिक वाटते. केवळ ९.२५% प्राथमिक शिक्षकांना ऑनलाईनची कामे अशैक्षणिक वाटतात.

मात्र निवडणुक आयोगाची कामे, सर्वेक्षण पोषण आहार, ऑनलाईन माहिती सादर करणे, विविध अहवाल सादर करणे इत्यादी सर्व कार्ये अशैक्षणिक आहेत असे मत नोंदवणा-या प्राथमिक शिक्षकांचे प्रमाण ९४.२८% इतके जास्त आहे.

१२) अशैक्षणिक कामे पूर्ण करण्यासाठी प्राथमिक शिक्षकांनी सुचविलेल्या उपाययोजना यामध्ये अशैक्षणिक कामे करण्यासाठी बेरोजगारांकडून ही कामे पूर्ण करावीत ही उपाययोजना सर्वाधिक ६२.००% शिक्षकांनी सुचविली आहे. तर इतर पर्यायी व्यवस्था निर्माण करावी असे ३७.१४% प्राथमिक शिक्षकांनी सचुविले आहे.

१३)४२.८५% शिक्षकांना असे वाटते की शासनाने निर्णय घेतांना समाजातील जनमताचा विचार करावा.

१४) आजमितीला भौतिक सुविधांची कमतरता आहे असे ९४.२८% प्राथमिक शिक्षकांना वाटते. तर केवळ ५.७२% प्राथमिक शिक्षकांना भौतिक सुविधांची कमतरता नाही असे वाटते.

१५) ४०.००% प्राथमिक शिक्षकांना शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करताना अडचणी येतात. तर ३७.१४% शिक्षकांना शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करताना अडचणी येत नाहीत.

**समोराप -**

प्राथमिक शिक्षण हा स्तर शालेय शिक्षणातील सर्वात महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच वय वर्ष ६ ते १४ हा प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत या RTE धोरणातंर्गत येतो. त्यामुळे शाळेत आलेले मुल टिकले पाहिजे, त्याला शिक्षणाची गोडी लागली पाहिजे , किमान अध्ययन क्षमता आत्मसात केल्या पाहिजेत. यासाठी प्राथमिक शिक्षकाने पुर्णक्षमतेने कार्य करावे. त्याच्या कार्यावर शासनाने घेतलेल्या निर्णयाचा विपरित परिणाम होऊ नये याची दक्षता शासन, समाज, शासनस्तरावरील अधिकारी, पालक इत्यादी सर्वांनी घेणे गरजेचे वाटते. कोणताही शासन निर्णय मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी घेतला जात असतो पण त्याचे दूरगामी परिणाम विचारात घेऊन अमंलबजावणी करावी ही अपेक्षा असते.

**संदर्भ -**

मुळे,रा.शं. व उमाठे वि.तु. (१९९८) **शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे.** नागपूर : श्री विद्या प्रकाशन.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (२००२) **संशोधनात सांख्यिकी तंत्राचे उपयोजन एम.एड.साठी पुस्तक.नाशिक.**

पंडित, बन्सी बिहारी (२००७) **शिक्षणातील संशोधन.** पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

http://www.unishivaji.ac.in/uploads/syllabus/Education/B.Ed/B.%20Ed.%202%20Year%20Syllabus.PDF



Late Dr. A. D. Shinde



Late D. K. Shinde

## About the Institute

Chhatrapati Shahu Institute of Business Education and Research Kolhapur, popularly known as CSIBER, was established in 1976. CSIBER is one of the few institutes in Maharashtra catering to the needs of Quality Higher Education in Southern Maharashtra and part of North Karnataka by providing professional education, training and skill development to the youths of country.

In order to further improve the academic standards, the Institute opted for Autonomy in 1995. "To be an Institute of First Choice of Students" is the mission being realized by the stakeholders of this institute



## About the College



D. K. Shinde College of Education Gadhinglaj, Dist Kolhapur was established in 1990. Dr. A. D. Shinde Founder, Former director and managing trustee established this college in memory of his father Late Dinkarrao Keshavrao Shinde who devoted his entire life for educating the masses in Gadhinglaj Taluka.

Our College is well known teacher education Institute; recognized by NCTE and reaccredited by NAAC. Our college organizes seminars, conferences and workshops on Education at state and national level. Student teachers participate in various activities such as Cultural programme, Blood Donation, Rally on Social awareness, Plantation etc. Thus our college works as a center for overall development of our trainee teachers.


## Published by

Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

ISSN 2349-638x | Impact Factor 5.707

**Chief Editor- Pramod Tandale**

Website:www.aiirjournal.com Email: aiirjpramod@gmail.com



ISSN 2349-638x

Impact Factor 5.707

Special Issue No. 50


**Indian Council of Social Science Research Sponsered**

# NATIONAL SEMINAR ON THE ACCOMPLISHMENT OF INDIA VISION 2020

**Friday**

**22nd February 2019**

## Organized by

Chh.Shahu Institute of Business, Education and Research Trust (CSIBER), Kolhapur

## D. K. SHINDE COLLEGE OF EDUCATION, GADHINGLAJ


Maruti Mal, Kadgaon Road, Gadhinglaj Dist - Kolhapur, State - Maharashtra. PIN 416502

Phone 02327 278063

*Website : www.dksg.co.in* *Email : principal@dksg.co.in*


## Edited by

| Seminar Director | Convener | Member | |
|---|---|---|---|
| Dr. S. M. Raykar | Dr. T. Y. Patel | Mrs. S. E. Powar | Mr. B. D. Patil |
| | | Mr. B. S. Khochage | Mrs. S. J. Ghatage |

Chh. Shahu Institute of Business, Education and Research (CSIBER), Kolhapur

# D.K.SHINDE COLLEGE OF EDUCATION
# GADHINGLAJ

## ORGANIZES

ICSSR SPONSERED

# NATIONAL SEMINAR

ON

# THE ACCOMPLISHMENT OF INDIA VISION 2020

**Date : 22nd February 2019**

**CHIEF PATRON**
Adv.S.D.Shinde
President CSIBER

**PATRON**
Dr.R.A.Shinde
Secretary & Managing Trustee
CSIBER

**KEYNOTE SPEAKER**
Dr.C.S.Vazalwar
Head
Department of Education,
Guru Ghasidas Vishwavidyalaya,
(A Central University)
Bilaspur,Chhattisgarh.495009

# Index


| | | | |
|---|---|---|---|
| 43. | कु.नाईक प्रतिका तानाजी | सेंद्रिय शेती व पर्यावरण | 141 |
| 44. | डॉ. पाटील अनिल डी. | गडहिंग्लज शहरातील आठवडी बाजार आणि वाहतुकीची कोंडी : समस्या आणि उपाय | 144 |
| 45. | प्रा.पाटील बाळगोंड दत्तात्रय | कुमारवयातील विद्यार्थ्यांमध्ये सुसंवाद निर्मितीसाठी कृती आराखडा | 146 |
| 46. | पाटील मनिषा रामगोंडा | डिजीटल इंडियाचा क्रीडी क्षेत्रातील विकासात सहभाग | 151 |
| 47. | पाटील निलम | महासत्ताक भारतातील बदलांचे संमिश्र पडसाद | 153 |
| 48. | प्रा. पोवार संजीवनी एकनाथ | राष्ट्रीय एकात्मता काळाची गरज | 156 |
| 49. | डॉ. रायकर शि. मा. | भारतातील उच्च शिक्षण : वास्तव आणि आव्हाने | 160 |
| 50. | प्रा. रेडेकर लोहिता दिनकर | महासत्तेच्या स्वप्नपूर्तीसाठी शैक्षणिक क्रांती महत्त्वाची | 164 |
| 51. | श्री.सुशील शिवलकर<br>डॉ. व्हनबटटे आर.बी. | **अध्यापक महाविद्यालयातील छात्र शिक्षकांमध्ये शांततेसाठी शिक्षण विषयक जाणीवजागृतीसाठी विकसित उपक्रमांच्या परीणामकारकतेचा अभ्यास** | 167 |
| 52. | भरत वेदपाठक | शांती, सुरक्षा व राष्ट्रीय ऐक्य – नजर 2020 – एक चर्चा | 169 |
| 53. | **प्रा. कोळी विमल अंकुश** | **प्रधान मंत्री मुद्रा योजना सर्वांसाठी रोजगार** | 174 |
| 54. | **डॉ.सौ. नलवडे वंदना शिवाजीराव**<br>**प्रा.डॉ. मोरे केशव रामभाऊ** | **२०२० साली भारत महासत्ता बनविण्यामध्ये युवकांची भूमिका** | 177 |
| 55. | **डॉ. श्री. पाटील डी. एम्.** | **भारतातील शिक्षण : मानवाधिकार आणि दृष्टीकोन २०२०** | 179 |
| 56. | **प्रा. साळवे शर्मिला शहाजी**<br>**प्रा.तेरदाळे सुलोचना हरिबा** | **विकसित, प्रगल्भ, संपन्न भारत-एक चिंतन : उपाय** | 185 |
| 57. | **डॉ. शेळके रावसाहेब केराप्पा** | **उच्च शिक्षणातील ई - गव्हर्नन्स** | 189 |

# उच्च शिक्षणातील ई - गव्हर्नन्स

**डॉ. शेळके रावसाहेब केराप्पा**
सहाय्यक प्राध्यापक
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय
श्री मौनी विद्यापीठ, गारगोटी ता. भुदरगड जि. कोल्हापूर
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

**सारांश ( Abstract) -**

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जात आहे. या शतकाचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत याचा आपण विशेष आनंद व अभिमान बाळगणे गरजेचे आहे. प्रत्येक शतकाची कालखंडाची काही वैशिष्टये असतात त्याप्रमाणे २१ वे शतक हे तंत्रज्ञानाने युक्त शतक आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी जीवन अधिक सुखकर होण्यासाठी करणे गरजेचे आहे मानवीजीवन सुखकर होणे म्हणजे काय तर लोकांचे जीवनमान सुधारणे, आरोग्य सुविधा चांगल्या मिळणे, स्वच्छ हवा व शुध्दपाणी मिळणे, चांगले शिक्षण मिळणे एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक , राजकीय, न्यायीक इत्यादीबाबतीत समानता आणणे, साक्षरतेचे प्रमाण वाढविणे, गरीबी कमी करणे व सर्वांना चांगल्या दर्जेदार सेवा देणे इत्यादी बाबींसाठी सुशासनाची गरज असते. सुशासन हे गतीमान व पारदर्शक व्हायचे असेल तर नवीन तंत्रज्ञान नवीन कार्यनिती, नवीन पर्यवेक्षण यंत्रणा, मूल्यमापन यंत्रणा यांचा स्वीकार करणे अपरिहार्य असते व ती काळाची गरज सुध्दा असते . उपरोक्त सर्व बाबींचा विचार प्रस्तुत सैद्धांतिक चिंतनपर पेपरमध्ये करत असताना विशेषता भारतातील उच्च शिक्षणातील ई - गव्हर्नन्सचा विचार केला आहे.

**कळीचे शब्द (Key words) -** ई - गव्हर्नन्स, उच्च शिक्षण, माहिती संप्रेषन तंत्रज्ञान

## प्रस्तावना :-

प्रत्येक देश आपली प्रगती करत असताना प्रगती साध्यतेसाठी काही ध्येये नजरेसमोर ठेवून कार्य करत असतो. भारत देशानेही २० वर्षाचे ध्येय ठरविण्यासाठी डॉ. एस. पी. गुप्ता (भारत सरकार, नियोजन आयोग सदस्य ) यांच्या अध्यक्षतेखाली जून २००० मध्ये समिती स्थापन केली होती. यामध्ये ३० हून अधिक विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी काम केले. त्यांनी अनेक क्षेत्रांचा व समस्यांचा अभ्यास केला. मात्र त्यापैकी रोजगार आणि शिक्षण यासंबंधी मुद्दे उपस्थित केले गेले. त्यामध्ये प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आग्रह धरला गेला. या दृष्टीने विचार केला असता प्रस्तुत सैद्धांतिक चिंतनपर पेपरमध्ये गेल्या १८-१९ वर्षातील ई - गव्हर्नन्स यामधील विशेषता उच्च शिक्षणाचा विचार केला आहे .

## ई- गव्हर्नन्स अर्थ

**ई - गव्हर्नन्स म्हणजे** Electronic governance or e-governance is the application of information and communication technology (ICT) for delivering government services, exchange of information, communication transactions, integration of various stand-alone systems and services between government-to-citizen (G2C), government-to-business (G2B), government-to-government (G2G), government-to-employees (G2E) as well as back-office processes and interactions within the entire government framework.[1] Through e-governance, government services are made available to citizens in a convenient, efficient, and transparent manner. The three main target groups that can be distinguished in governance concepts are government, citizens, and businesses/interest groups. In e-governance, there are no distinct boundaries

Ref.-https://en.wikipedia.org/wiki/E-governance

E-governance, expands to **electronic governance**, is the integration of **Information and Communication Technology (ICT)**in all the processes, with the aim of enhancing government ability to address the needs of the general public. The basic purpose of e-governance is to simplify processes for all, i.e. government, citizens, businesses, etc. at National, State and local levels

वरील व्याख्यांवरुन ई - गव्हर्नन्स म्हणजे ई - सुशासन होय. शासन सेवा या ग्राहक, नागरिक व्यावसायिक, नोकरदार इत्यादीपर्यंत परिणामकारकपणे भ्रष्टाचार मुक्त व जलदगतीने पोहचविण्यासाठी माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करणे . म्हणजेच शासनाची सेवा देण्याची क्षमता वृद्धिंगत करणेसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे होय.




भारतामध्ये १९५१ मध्ये साक्षरतेचे प्रमाण १८% इतके होते ते २००१ मध्ये ६५ % इतके झाले . मात्र व्हिजन २०२० यामध्ये हे प्रमाण १००% इतके व्हावे असा दृष्टिकोन ठेवला होता. तसेच ६ ते १४ वयोगटातील मुलांचे शाळेत दाखल होण्याचे प्रमाण १००% असावे हा दृष्टिकोनही अंगीकारला होता. यादृष्टिकोनातून २०१० मध्ये शिक्षण हक्क कायदा अमंलात आणला आहे.

विशेषता उच्च शिक्षणाचा विचार करता १९५१ मध्ये भारतात सामान्य शिक्षण देणारी महाविद्यालये ही ३७० होती तर व्यावसायिक शिक्षण देणारी महाविद्यालये २०८ होती आणि २७ विद्यापीठे होती. ही संख्या १९८८ मध्ये अनुक्रमे ७१९९, २०७५ आणि २२९ इतकी झाली. संदर्भ-भारत सरकार शिक्षण विभाग . सध्या दिनांक २०. १२. २०१८ रोजी भारतात एकूण

| | |
|---|---|
| राज्य विद्यापीठे | ३९४ |
| स्वायत्त विद्यापीठे | १२५ |
| केंद्रीय विद्यापीठे | ४८ |
| खाजगी विद्यापीठे | ३२५ |
| एकूण | ८९२ |

८९२ इतकी विद्यापीठे आहेत. त्यामुळे उच्च शिक्षण देणा-या विद्यापीठांच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांची संख्याही वाढल्याने पर्यायाने विद्यार्थी संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देणेसाठी उच्च शिक्षणात ई- शासनाची गरज आहे. उच्च शिक्षण देणा-या संस्थामध्ये विद्यार्थ्यानी प्रवेश घ्यावा. यासाठी सध्या गुणावत्ता हा ऐकमेव निकष आहे. केवळ भारतातीलच नव्हे तर परदेशातील मुले ही भारतात शिक्षण घेत आहेत. त्यामुळे सध्या प्रवेशापासून निकाल व नोकरी (Placement) इथपर्यंतच्या सर्व टप्प्यासांठी ई- गव्हर्नन्स वापरला जात आहे. कदाचित व्हिजन २०२० मधील पूर्णत्वाकडे जाणारा टप्पा म्हणून या क्षेत्राकडे पाहता येईल.

ई- गव्हर्नन्सच्या क्षेत्रानुसार भारतात उच्च शिक्षणात त्याचा वापर कसा केला जात आहे ते खालीलप्रमाणे सांग़ता येईल.

**१) प्रवेश - प्रवेशाची प्रसिध्दी ( जाहिरात )**

१.१ भारतातील उच्च शिक्षण देणा-या सर्वच संस्थानी स्वतः च्या वेबसाईट विकसित केल्या आहेत. त्यामुळे प्रवेशासंबधीच्या जाहिराती या वेबसाईटवर प्रसिध्द केल्या जातात. तसेच इंटरनेट, टी. व्ही इतर सोशल मिडिया साधने, वृत्तपत्रे मासिके यामधुन या जाहिराती प्रसिध्द केल्या जातात.

**१.२ प्रवेश अर्ज भरणे -** जाहिरातीतील नमूद केल्याप्रमाणे ऑनलाईन अर्ज हे प्रवेशपूर्व परीक्षेसाठी ( CET) भरुन घेतले जातात.

**१.३ प्रवेश पूर्व परीक्षेसाठी हॉल टिकिट -** यासाठी सुध्दा प्रवेशपूर्व परीक्षेसाठी दिलेल्या सूचनांनुसार परीक्षार्थी विद्यार्थ्याने ते ऑनलाईन स्वरुपात स्वतःचा आयडी - पासवर्ड वापरुन डाऊनलोड करुन घ्यावे ही सूचना दिलेली असते. त्या प्रमाणे डाऊनलोड करुन घेतले जाते.

**१.४ प्रवेश परीक्षेसाठीचे शुल्क -** प्रवेश पूर्व परीक्षेसाठीचे आवश्यक शुल्क सुध्दा ऑनलाईन स्वरुपात भरुन घेतले जाते.

**१.५ प्रवेशपूर्व परीक्षा - (CET)**

ऑनलाईन स्वरुपात प्रसिध्द केलेल्या जाहिरातीत नमूद केललेल्या तारखेला सी ई टी परीक्षा ही ऑनलाईन अथवा ऑफलाईन स्वरुपात घेतली जाते.

**१.६ प्रवेशपूर्व परीक्षेची उत्तरसूची -** जी सीईटी घेतलेली आहे त्याची उत्तरसूची प्रसिध्द केली जाते. त्यावरील हरकती विचारात घेऊन अंतिम निकाल जाहीर केला जातो.

**१.७ निकाल** - सी ई टी परीक्षांचे निकाल ऑनलाईन स्वरुपात जाहीर केले जातात.

**१.८ गुणवत्ता यादी** - सी ई टी परीक्षेची गुणवत्ता यादीही ऑनलाईन स्वरुपात प्रसिध्द केली जाते.

**१.९ प्रवेश निश्चिती - (Provisional Admission)**

शासन नियम , उपलब्ध जागा आरक्षण, विषय इत्यादी बाबी विचारात घेऊन प्रवेश फे-यांनुसार तात्पुरते प्रवेश निश्चित केले जातात.

**१.१० अंतिम प्रवेश निश्चिती -**

सध्या काही पदव्यांच्या अंतिम प्रवेशाची निश्चिती करण्यासाठी कागदपत्रांची पडताळणी करणे यासाठी सुध्दा ऑनलाईन प्रक्रिया राबवली जाते आहे. उदा बी. एड . एम. एड, एल. एल. बी इत्यादी अभ्यासक्रमांचे अंतिम प्रवेश निश्चिती www. safalta.org या संकेतस्थळावरुन केली जात आहे.

**२) अभ्यासक्रम -** सध्या उच्च शिक्षणामध्ये अभ्यासक्रम निवडण्यासाठी घरबसल्या ऑनलाईन स्वरुपात विविध संकेत स्थळावरून माहिती मिळत आहे. तसेच कोर्स कालावधी, त्याची फी, अभ्यासक्रम उपलब्ध असणारी विद्यापीठे , महाविद्यालये त्यांची मूल्यमापन पद्धती अभ्यासक्रम निहाय उपलब्ध संधी इत्यादी सर्व माहिती तंत्रज्ञानानाच्या वापरामुळे घरबसल्या मिळते आहे.

**३) अभासी वर्ग** सध्या सर्वच अभ्यासक्रमाना अभासी वर्ग नसले तरी ही संकल्पना वापरली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीच्या वेळी सोयीच्या ठिकाणी या अभासी वर्गामध्ये सहभागी होता येते.

**४) ऑनलाईन टयुटोरींग -** सध्या face to face विद्यार्थी शिक्षक संपर्काऐवजी ऑनलाईन स्वरुपात संपर्क-संवाद साधला जात आहे एकाच वेळी एकापेक्षा अधिक शिक्षकांकडून ट्यटोरींग करून घेता येते तसेच यासाठी ठिकाणाचे ही बंधन राहिलेले नाही .

**५) विद्यापीठे / महाविद्यालये यांचे प्रशासन माहिती संकलन -**

शासनास वेळोवेळी सादर करावयाची माहिती यासाठीचा पत्रव्यवहार ई - मेल द्वारे केला जात आहे विशेषता माहिती संकलनासाठी AISHE, MIS इत्यादी माध्यमातून संकलीत करून प्रसिद्ध केली जात आहे.

**५.१ अनुदान** उच्च शिक्षणामध्ये वेतन संशोधनासाठी अनुदान, विविध योजनाच्या अंलबजावणीसाठी लागणारा निधी UGC, राज्य सरकार, रुसा तसेच इतर प्रायोजित संस्था यांच्याकडून दिली जाणारी अनुदाने ही IFMS ऑनलाईन स्वरुपात देवाण घेवाण केली जात आहे.

**५.२ शिष्यवृत्या** विद्यार्थ्यांना केंद्रसरकार, राज्य सरकार, बार्टी यांच्याकडून दिल्या जाणा-या विविध शिष्यवृत्या यासाठी पात्र विद्यार्थांकडून अर्ज सादर करणे, अर्जाची छाननी, अर्जामधील त्रुटी पूर्तता, शिष्यवृत्ती अदा करणे इत्यादी सर्व प्रक्रिया या ऑनलाईन स्वरुपात केल्या जात आहेत उदा . महाराष्ट्र राज्यात महाडीबीटी पोर्टलद्वारे चालू वर्षी ही प्रक्रिया राबविली जात आहे.

**५.३ वेतन -** महाराष्ट्रात वेतन देयके सादरीकरणासाठी एचटीई सेवार्थ प्रणाली वापरली जात आहे.

**६) स्वाध्याय -** अभ्यासक्रमाचे अध्ययन करत असतानाचे स्वाध्याय (Assienments) ऑनलाईन स्वरुपात सादर केल्या जात आहेत. त्याचे मूल्यमापनही ऑनलाईन करुन गुण / ग्रेड/ क्रेडीट दिले जात आहे.

**७) निर्णय -** उच्च शिक्षणामध्ये एखादा धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असल्यास त्यासंबंधीचा मसुदा संकेत स्थळावर प्रसिद्ध केला जातो. त्यासंबंधी विद्यार्थी, शिक्षक, पालक, नागरीक इत्यादीकडून हरकती अभिप्राय मागवून घेतले जातात व निर्णयांना अंतिम स्वरुप देऊन संकेत स्थळावर प्रसिद्ध केले जातात तसेच ते संबंधीतापर्यंत ई- मेल द्वारे पोहचवले जातात.

**८) संशोधन**

उच्च शिक्षणामध्ये ई- गव्हर्नन्सचा सर्वाधिक वापर संशोधन क्षेत्रात केला जात आहे अगदी संशोधन विषय निवडी पासून ते संशोधनाची अंतिम प्रसिद्धी पर्यंत सर्व टप्प्यावर ई- गव्हर्नन्सचा उपयोग प्रभावीपणे केला जात आहे.

**९) परीक्षा**

परीक्षा अर्ज भरणे, परीक्षा फी भरणे, परीक्षेसाठीचे हॉल टिकीट उपलब्ध करणे इत्यादी सर्व परीक्षा पूर्व कामामध्ये ई: गव्हर्नन्सचा उपयोग होतो. तसेच परीक्षेसाठीच्या प्रश्नपत्रिका वितरण यासाठी SRDP चा उपयोग केला जात आहे. तसेच उत्तर पत्रिकांच्या मूल्यमापनासाठी सुद्धा संगणकाधरित प्रणाली विकसीत केलेली आहे. त्यामुळे परीक्षेसंबंधी होणारे गैरप्रकार रोखण्यास मदत झाली आहे.

**१०) निकाल**

भारतात उच्च शिक्षणामध्ये निकाल जाहीर करण्यासाठी ई- गव्हर्नन्स मोठ्या प्रमाणात वापरले जात आहे. त्यामुळे तात्काळ निकाल विद्यार्थी, पालक यांना पाहता येतो. त्यासंबंधी शंका असल्यास तक्रार देखील करता येते.

**११) स्थाननिश्चिती (Placement)**

भारतात उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडणा-या, बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधी या अभ्यासक्रमानुसार विद्यापीठे /महाविद्यालये देत आहेत. यासाठी प्रत्येक विद्यापीठ महाविद्यालयामध्ये स्थानानिश्चिती विभाग स्थापन केला आहे. यांच्या मार्फत स्थाननिश्चिती शिबीरांचे आयोजन केले जाते याची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाते. तसेच संबंधीत विद्यार्थांना e-mail, sms, विद्यार्थ्यांचे whats app group यावरुन माहिती देऊन स्थाननिश्चिती शिबीरांमध्ये सहभागी होऊन नोकरी प्राप्त करण्याची संधी दिली जात आहे.

**१२ सेवांतर्गत / सेवापूर्व प्रशिक्षणे -**

भारतात उच्च शिक्षण संस्थामध्ये काम करणा-या कर्मचा-यांसाठी अभ्यासक्रम स्वयंम पोर्टल द्वारे शिक्षक विद्यार्थी कर्मचारी यांचेसाठी अभ्यासक्रम / कोर्स पूर्ण करण्याची ऑनलाईन सुविधा उपलब्ध केली आहे. तसेच स्वयंमचे कोर्स हे सर्वासाठी खुले व मोफत ठेवले आहेत. करु शकत्ता याचा लाभ अधिकाधिक कर्मचारी, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी करुन घेणे गरजेचे आहे.

**समारोप**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी २०२० मध्ये भारत महासत्ता होईल हे स्वप्न पाहिले होते त्यानुसार सरकारकडून प्रयत्न सुरु आहेत यादृष्टीने भारतीय उच्च शिक्षणामध्ये ई- गव्हर्नन्सचा वापर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो आहे ई- गव्हर्नन्समुळे उच्च शिक्षणामध्ये गतीमानता आली आहे. तसेच भ्रष्टाचार मुक्त पद्धतीने उच्च शिक्षणाच्या संधी सर्व सामान्यापर्यंत पोहचवल्या जात आहेत. तरीही यामध्ये काही त्रुटी आहेत तसेच याची व्यापकता वाढविणे गरजेचे वाटते मात्र व्हिजन २०२० पूर्ण करण्यासाठी अजूनही उच्च शिक्षणावरील खर्चात वाढ करणे रोजगार उपलब्ध करुन देणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ**

1. http://planningcommission.nic.in/reports/genrep/pl_vsn2020.pdf
2. https://businessjargons.com/e-governance.html
3. https://dictionary.cambridge.org/dictionary/english/e-governance
4. https://en.wikipedia.org/wiki/E-governance
5. https://www.ugc.ac.in/oldpdf/consolidated%20list%20of%20All%20universities.pdf

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

253

# National Conference
# on
# POLICIES AND PROSPECTS OF TEACHER EDUCATION - 2019

## NCPPTE - 2019

**5th and 6th January 2019**

ACHARYA JAWADEKAR COLLEGE OF EDUCATION
GARGOTI.

PRINCIPAL,
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapu



## Organized by

Post Graduate Department of Education and IQAC
Sant Gadge Baba Amravati University, Amravati
in Collaboration with
Maharashtra State Secondary Teacher Educator's Association (MSSTEA)

**Venue**
**A.V. Theater**
**Sant Gadge Baba Amravati University, Amravati**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)

# बी. एड. प्रशिक्षणार्थीमधील शिक्षक समायोजनाचा शोधिकेद्वारे अभ्यास

डॉ. रावसाहेब केराप्पा शेळके
सहाय्यक प्राध्यापक , आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
गारगोटी ता. भुदरगड जि. कोल्हापूर , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सारांश (Abstract)**



Life is a adjustment म्हणजेच संपूर्ण जीवन हे समायोजनाचे आहे. यशस्वीतेकडे वाटचाल करावयाची असल्यास समायोजन क्षमता असावी लागते व्यक्ती काणत्याही क्षेत्रात कार्यरत असो त्याला समायोजन करावेच लागते. यासंदर्भात जिमी डीन म्हणतात. I can't change the direction of the wand, but I can adjust my sails to always reach my destination म्हणजेच मी वाऱ्याची दिशा बदलू शकत नाही पण मला पवनचक्कीच्या पात्यांप्रमाणे बदलून माझ्या गंतव्यस्थानापर्यंत पोहचतो. शिक्षकालाही व्यक्तिगत जीवनातील समायोजनाबरोबर समायोजन साधावे लागते. त्याचप्रमाणे सामाजिक मानसशास्त्रीय आणि शारीरिक समायोजन साधावे लागते. व्यावसायिक सहसंबंधामध्ये समायोजन क्षेत्रामध्ये भावी शिक्षक होऊ इच्छीणाऱ्या बी.एड प्रशिक्षणार्थीची समायोजन क्षमता कशी आहे. तसेच काळानूरुप त्यामध्ये बदल होतो काय? पुरूष शिक्षक प्रशिक्षणार्थी व महिला शिक्षक प्रशिक्षणार्थी यांच्या समायोजन क्षमतेमध्ये फरक आहे काय? याचा पडताळा प्रमाणित डॉ.एस.के मंगल यांच्या मंगल शिक्षक समायोजन शोधिकेद्वारे घेतला आहे. तसेच ज्यांची क्षेत्रानुसार समायोजन क्षमता कमी आहे. त्यांना मार्गदर्शन व समुपदेशन केले आहे या बाबींचा आढावा प्रस्तूत संशोधन पेपरमध्ये करण्यात आला आहे.

कळीचे शब्द (key words) –
शिक्षक समायोजन, शिक्षक मंगल शिक्षक समायोजन शोधिका, मार्गदर्शन, समुपदेशन इत्यादी.

**प्रस्तावना**

बदलत्या काळामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला तसेच एकत्रित कुटूंब पद्धती ऐवजी विभक्त कुटुंब पद्धती अस्तित्वात आली आहे. शहरीकरण वाढले आहे. लोकांमधील संवाद कमी होत चालला आहे. त्यामुळे अनेक समस्या शैक्षणिक व सामाजिक जीवनात दिसून येत आहेत. यावर मात कशी करायची याचे प्रशिक्षण बदलत्या परीस्थितीमध्ये भावी शिक्षकांना व्हावे या हेतूने मानसशास्त्रीय मापन या प्रात्यक्षिकाचा समावेश बदललेल्या दोन वर्षीय बी.एड. अभ्यासकमात केला आहे. सदर प्रात्यक्षिकाचा समावेश शिवाजी विद्यापीठाच्या बी. एड. अभ्यासकमात दुसऱ्या वर्षाच्या तिसऱ्या सत्रामध्ये केला आहे. प्रस्तूत संशोधकाने बी.एड. प्रशिक्षणार्थीवर एवा मानसशास्त्रीय चाचणीचे आयोजन व मार्गदर्शन 2015–16 पासून बी.एड. केले त्यावेळी प्रस्तुत संशोधकाला काही बी.एड.प्रशिक्षाणार्थीच्या मधील समायोजन शोधिकेमध्ये दिलेल्या क्षेत्रानुसार कमी आढळून आले तेव्हा भावी

शिक्षकांचे समायोजन कमी असल्यास यशस्वी शिक्षक कसा होणार तसेच महिला व पुरुषप्रशिक्षार्थी यांच्या समायोजनामधील फरक काय असेल ? व 2016 –17 , 2017–18 व 2018–19 या शैक्षणिक वर्शात काळानुसार तुलनात्मक दृष्टा क्षेत्रनिहाय काय फरक दिसून येता का? या बाबींचा प्रस्तुत संशोधनवर पेपरमध्ये अभ्यास केलेला आहे.

## संशोधनाची गरज व महत्त्व

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रमाणित मानसशास्त्रीय शिक्षक समायोजन शोधिकेमध्ये दिलेल्या क्षेत्रानुसार समायोजनाचा अभ्यास केल्यास यशस्वी शिक्षकाची गुणवैशिष्ट्ये लक्षात येतात. शिक्षकाचे समायोजन चांगले असल्यास तो यशस्वी शिक्षक होतो. तसेच शिक्षकाला मानशास्त्रीय चाचणी वापराचे महत्त्व व गरज कळल्याने तो आपल्या विद्यार्थीच्या समस्यावर उपाय म्हणून प्रगतीसाठी त्यांचा वापर करता येईल महिला व पुरुष शिक्षकांच्या समायोजनाच्या तुलनात्मक अभ्यास केल्याने त्यांचे दृष्टीकोन लक्षात येण्यास मदत झाली आहे. समायोजन क्षमता वाढवण्यासाठी काय केले पाहीजे याच्या जाणीवा विकसीत करण्यासाठी प्रस्तूत संशोधन गरजेचे व महत्वाचे आहे. प्रस्तूत संशोधनाचे निष्कर्ष हे मानसशास्त्रीय चाचणीचे अभ्यासक, संशोधक विद्यार्थी व शिक्षक प्रशिक्षक यांचेसाठी उपयुक्त आहेत.

## संशोधनाची उद्दिष्टे –

1) बी .एड. प्रशिक्षाणार्थीनी मंगल शिक्षक समायोजन शोधिकेला दिलेल्या प्रतिसादाचा अभ्यास करणे.
2) पुरूष प्रशिक्षणार्थी व महिला बी.एड. प्रशिक्षणार्थीनी मंगल शिक्षक समायोजन शोधिकेला दिलेल्या प्रतिसादाचा तुलनात्मक अभ्यास करणे.
3) शैक्षणिक वर्ष2016–17, 2017–18 व 2018–19 मध्ये बी.एड. प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थी मंगल शिक्षक समायोजन शोधिकेला दिलेला प्रतिसादाचा वर्शानुसार तुलनात्मक अभ्यास करणे.

## शून्य परीकल्पना

1) महिला व पुरुषबी. एड. प्रशिक्षणार्थीचे मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये लक्षणीय फरक नाही.
2) शैक्षणिक वर्षानूसार बी.एड प्रशिक्षणार्थीच्या मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये लक्षणीचे फरक नाही.
3) शैक्षणिक वर्षानूसार महिला – महिला व पुरुष – पुरुष बी.एड. प्रशिक्षणार्थीचे मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये लक्षणीय फरक नाही.

## संशोधन परिकल्पना

1) महिला व पुरुष बी. एड. प्रशिक्षणार्थीचे मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये फरक आहे.
2) शैक्षणिक वर्षानूसार बी.एड प्रशिक्षणार्थीच्या मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये फरक आहे.
3) शैक्षणिक वर्षानूसार महिला – महिला व पुरुष – पुरुष बी.एड. प्रशिक्षणार्थीचे मंगल शिक्षक समायोजन शोधिकेमधील समायोजन यामध्ये फरक आहे.

## संशोधनाची व्याप्ती–

महाराष्ट्र राज्यातील बी.एड. महाविद्यालयामध्ये प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीना प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष लागू पडतात.

## संशोधनाची परीमर्यादा

1) प्रस्तुत संशोधन हे डॉ.एस .मंगल शिक्षक समायोजन शोधिकेपूरते मर्यादित आहे.

2) प्रस्तुत संशोधन आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी येथे शैक्षणिक वर्ष 2016–17, 2017–18, 2018–19 या शैक्षणिक वर्षात बी.एड द्वितीय वर्शात प्रशिक्षण घेतलेल्या व शोधिका वापराच्या दिवशी उपस्थित प्रशिक्षणार्थी पुरते मर्यादित आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोनामध्ये बी.एड.प्रशिक्षणार्थीचे सद्यस्थितील समायोजनाचा अभ्यास केला असल्याने सर्वेक्षण पद्धतीमधील विद्यालय सर्वेक्षण या संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

## नमुना निवड

प्रस्तुत संशोधनासाठी नमुना म्हणून सहेतूक नमुना निवडीने आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी या महाविद्यालयात 2016–17, 2017–18 2018–19 मध्ये बी.एड. प्रशिक्षण घेतलेल्या सर्वच प्रशिक्षणार्थीची निवड केली आहे

## संशोधन साधन

प्रस्तूत संशोधनात सामग्री संकलनासाठी राश्ट्रीय मानसशास्त्रीय महामंडळ, आग्रा यांचे कडून 2008 मध्ये प्रसिद्ध केलेल्या मंगल शिक्षक समायोजन शोधिका (MTAI-M) हिंदी आवृतीचा त्मनेंइसम ठववासमज व डॉ. एस.के. मंगल यांच्या राष्ट्रीय मानसशास्त्रीय महामंडळ, आग्रा यांचे कडून 2008 मध्ये प्रसिद्ध केलेल्या मंगल शिक्षक समायोजन शोधिका (MTAI-M) Manual चा उपयोग केला आहे.

## संशोधनाची कार्यवाही

